POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३१६ ● मुंबई, गुरुवार, १८ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

नीट युजी २०२६ परीक्षा पारदर्शकतेने पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी घेतला आढावा

■ठाणे। प्रतिनिधी,

आगामी २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या 'नीट युजी २०२६' (NEET UG 2026) या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील राष्ट्रीय परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. ही परीक्षा कोणत्याही त्रुटीशिवाय, अत्यंत पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज शासकीय अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन परीक्षा तयारीचा सविस्तर आढावा घेतला. या राष्ट्रीय परीक्षेची संवेदनशीलता आणि गतवेळच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता, जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर चोख नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी दिले.

या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीस तहसिलदार (महसूल) रेवण लेंभे, तहसिलदार (करमणूक) मीनल दळवी यांच्यासह परीक्षा प्रक्रियेशी संबंधित विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले की, यंदा राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (NTA) संपूर्ण देशभरात आणि परदेशातील केंद्रांवर एकाच दिवशी परीक्षा घेण्याचे नियोजन केले असून, देशपातळीवर २२.७९ लाख उमेदवारांची नोंदणी झाली आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण 25 परीक्षा केंद्र जिल्ह्यातूनही 12325 विद्यार्थी या परीक्षेला बसणार असल्याने प्रत्येक परीक्षा केंद्राची सज्जता अंतिम टप्प्यात आणणे आवश्यक आहे. या परीक्षेसाठी



राष्ट्रीय स्तरावर ६७४ शहर समन्वयक, ५,४४६ केंद्र अधीक्षक आणि सुमारे १.९० लाख पर्यवेक्षकांची मोठी यंत्रणा कार्यरत आहे. आपल्या जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासन, महसूल विभाग आणि परीक्षा केंद्र प्रमुख यांनी परस्परांशी समन्वय ठेवून काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या परीक्षेच्या नियमांनुसार दुपारी ०१:३० वाजता परीक्षा केंद्रांचे मुख्य गेट बंद केले जाणार असून, त्यानंतर कोणत्याही उमेदवाराला प्रवेश दिला जाणार नाही, ही बाब जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केली. तसेच उमेदवारांची बायोमेट्रिक पडताळणी झाल्यानंतरच त्यांच्या प्रवेशपत्रावर 'होलोग्राम' स्टिकर लावला जाईल. परीक्षा केंद्रांवर जॅमर, सीसीटीव्ही कॅमेरे, वीज पुरवठा आणि जनरेटरची बॅकअप व्यवस्था दुपारी १२:०० वाजेपर्यंतच तपासून पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी यंत्रणेला दिले. परीक्षा दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५:१५ या वेळेत होणार असून उमेदवारांना १९५ मिनिटांचा कालावधी मिळेल. या संपूर्ण प्रक्रियेत मोबाईल फोन किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणाला परीक्षा केंद्रात प्रवेश असणार नाही, अगदी कर्तव्यावर असणाऱ्या कोणत्याही शासकीय किंवा परीक्षा कर्मचाऱ्यालाही परीक्षा केंद्रात मोबाईल वापरता येणार नाही, या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश डॉ. पांचाळ यांनी दिले.

बैठकी दरम्यान तहसिलदार (महसूल) रेवण लेंभे आणि तहसिलदार (करमणूक) मीनल दळवी यांनी परीक्षा केंद्रांच्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था, गोपनीय साहित्याची वाहतूक आणि केंद्र स्तरावरील नियोजनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली. परीक्षा संपल्यानंतर मूळ गुलाबी रंगाची ओएमआर (PINK OMR) उत्तरपत्रिका उमेदवारांच्या उपस्थितीतच सील करून, त्यावर दोन उमेदवार साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याच्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत केंद्र प्रमुखांना निर्देशित करण्यात आले आहे. ही सर्व वाहतूक आणि साहित्याची देवाणघेवाण 'एनटीए लॉजिस्टिक्स ट्रॅकिंग ॲप'द्वारे क्यूआर कोड स्कॅन करून रिअल-टाइम ट्रॅक केली जाणार आहे. परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार आढळून आल्यास सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अंतर्गत संबंधित व्यक्तींवर तात्काळ कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या बैठकीत दिला.

मिरा-भाईंदरमध्ये एमआयडीसीचा पाणीपुरवठा २४ तास बंद

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

अल निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे यावर्षी पावसाळा लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी काळात शहरात पाणी टंचाईची गंभीर परिस्थिती उद्भवू नये म्हणून जलसंपदा विभागासोबत झालेल्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार मिरा-भाईंदर शहरात पाणी कपात लागू करण्यात आली असून गुरुवार, १८ जून रोजी दुपारी १२ वाजेपासून ते शुक्रवार, १९ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत एकूण २४ तास एम.आय.डी.सी. कडून होणारा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे, असे मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागाकडून सांगण्यात आले आहे. मिरा- भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. विविध राजकीय पक्षाकडून पाणी टंचाईविरोधात मोर्चे काढण्यात येत आहेत.त्यात गुरुवारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून शहराला मिळणारा पाणी पुरवठा २४ तास पूर्णपणे बंद राहणार आहे. या कालावधीत स्टेम प्राधिकरण कडून होणारा पाणी पुरवठा सुरळीत सुरू राहणार आहे. जलसंपदा विभागासोबत ९ जून रोजी आढावा बैठक पार पडली होती. पावसाळा लांबण्याची शक्यता असल्याने भविष्यातील पाणी टंचाई टाळण्यासाठी २०% पाणी कपात करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. याच नियोजनाचा भाग म्हणून हा २४ तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे. एम.आय.डी.सी. कडून होणारा पाणी पुरवठा पुन्हा पूर्ववत होईपर्यंत संपूर्ण मिरा-भाईंदर शहरात पुढील काही दिवस कमी दाबाने आणि उशिराने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे.

मुंबईकराचं टेन्शन वाढवणार?

पुढल्या आठवड्यापासून डायरेक्ट पाणीकपात वाढणार पालिकेचा निर्णय



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये केवळ १०% जलसाठा शिल्लक असल्याने शहरावर गंभीर पाणीटंचाईचे संकट आले आहे. मान्सून लांबण्याचा इशारा मिळाल्याने पालिका सध्याची १०% पाणीकपात पुढील आठवड्यापासून २०% पर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे. पिण्याच्या पाण्याचा बांधकामासाठी किंवा गाड्या धुण्यासाठी गैरवापर केल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

जून महीना अर्धा संपत आला तरी राज्यात मान्सूनचा काहीच पत्ता नाही. एकीकडे असह्य उकाडा, घामाच्या धारा, चिकचिक, गरमी यामुळे मुंबईकर भयानक वैतागले आहेत. त्यातच आता मुंबईकरांच टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये आता पक्त 10 टक्के पाणीसाठी शिल्लक आहे. याच पार्श्वभूमीवर पालिका पुढच्या आठवड्यापासून 20 टक्के पाणी कपात करण्याच्या विचारात आहे. मुंबईत सध्या अनेक ठिकाणी 10 टक्के पाणीकपात सुरू आहे. मात्र पालिका आता पाणीकपात आणखी 10 टक्के वाढवण्याचा निर्णय घेऊ शकते. लांबलेल्या पावसामुळे मुंबईकरांवरचं पाणीटंचाईचं संकट गदड झालं असून येणाऱ्या काळात पाणीकपात होऊ शकते. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सात तलावांत फक्त 10 टक्के जलसाठा उरला आहे. लवकरच पाऊस येऊन पुरेसा साठा निर्माण झाला नाही तर मात्र पालिकेला कठोर निर्णय घ्यावे लागतील, त्यांना सध्याची 10 टक्के पाणीकपात वाढवून 20 टक्के इतकी करावी लागू शकते.

पालिका करणार कारवाई

दरम्यान पालिकेने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. पिण्याचं पाणी हे बांधकामासाठी, स्वीमिंग पूलसाठी किंवा गाड्या धुण्यासाठी वापरलं तर पालिकेकडून कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पालिका प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

7 तलावांनी गाठला तळ, आता फक्त...

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांनी तळ गाठला आहे. त्यामध्ये आता फक्त 10 पाणी शिल्लक आहे. ते कमी की काय म्हणन आता मान्सून देखील आणखी लांबणार असल्याचा इशारा भारतीय हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. यामुळे पुढील आठवड्यापासू पाणी कपात 20 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रशासनाचा विचार आहे. सध्या मुंबईत 10 टक्के पाणी कपरात असली तरी पुढील आठवड्याती ती वाढवली जाऊ शकते. तलाव भरेपर्यंत पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी सध्या सुरू असलेली 10 टक्के पाणीकपात वाढवून, पुढील आठवड्यापासून ती 20 टक्क्यांपर्यंत करण्याचा विचार पालिका प्रशासनाकडून सुरू आहे. पिण्याच्या पाण्याचे संभाव्य संकट पाहता पिण्याचे पाणी बांधकामासाठी, स्विमिंग पूल, क्लब आणि गाड्या धुण्यास वापरल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला. तसेच पाण्याचा अयोग्य वापर आणि पाणीपुरवठ्याचे आगामी नियोजन यासाठी पुढील आठवड्यात बैठक घेण्यात येणार आहे. यावेळी शिल्लक जलसाठा किती, ते पाहून पाणीकपात आणखी 10 टक्के वाढवण्याचा पालिकेचा विचार आहे. यामुळे पालिका काय निर्णय घेते याकडे सर्व मुंबईकरांचे लक्ष लागलं आहे.

15 जूनपर्यंतचा पाणीसाठा किती ? (दशलक्ष लीटरमध्ये)

- अप्पर वैतरणा – 0
- तुळशी – 1,899
- तानसा – 8,029
- विहार – 11,825
- मध्य वैतरणा – 21, 674
- मोडक सागर – 39, 823
- भातसा – 71, 917

एवढा पाणीसाठा आता शिल्लक आहे.

नालासोपाऱ्यात मोठी कारवाई...

1.39 कोटींच्या कोकेनसह परदेशी नागरिक ताब्यात



■वसई। प्रतिनिधी,

नालासोपारा परिसरात अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत दहशतवाद विरोधी पथक आणि पोलिसांनी संयुक्त मोहिमेत मोठ्या प्रमाणात कोकेन जप्त केले आहे. या कारवाईत एका परदेशी नागरिकाला ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नालासोपारा पूर्व परिसरात गुप्त माहितीच्या आधारे राबवण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. दहशतवाद विरोधी पथक आणि स्थानिक पोलिसांनी मिळून केलेल्या कारवाईत सुमारे 278 ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे बाजार किंमत 1 कोटी 39 लाख 10 हजार रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात हुसेन मार्क कॉपी (वय 38) या परदेशी नागरिकाला ताब्यात घेण्यात आले आहे. प्राथमिक चौकशीत तो पश्चिम आफ्रिकेतील आयव्हरी कोस्ट देशाचा रहिवासी असल्याचे समोर आले आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नालासोपारा पूर्वेतील प्रगती नगर, हाय स्टेशन रोड परिसरात सापळा रचण्यात आला. संशयित व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे अमली पदार्थ आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत जप्तीची कारवाई केली. ही संपूर्ण कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अळउ अधिकारी राहुल फड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही मोहीम राबवली. दरम्यान, जप्त करण्यात आलेले कोकेन नेमके कुठून आणण्यात आले होते, त्याचा पुरवठा कुठे केला जाणार होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे का याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.



धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याच्या तक्रारीनंतर कोंढवा पोलिसांची कारवाई

पुणे : प्रार्थनेच्या माध्यमातून कर्करोग आणि ट्यूमरसारखे असाध्य आजार बरे करण्याचा खोटा दावा करणाऱ्या एका धर्मगुरूसह आठ जणांविरुद्ध पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा परिसरातील एका प्रार्थनास्थळात अंधश्रद्धा पसरवण्याचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी एका ३२ वर्षीय महिला कार्यकर्त्यार्ने तक्रार दिली आहे. पास्टर केनेथ पॉल सिल्वे आणि त्याच्या सात ते आठ कार्यकर्त्यांवर जादुटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रशांत मंडले या प्रकरणाचा तपास करत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत सक्रिय असलेल्या तक्रारदार महिला रविवारी त्यांच्या एका मैत्रिणीसह या प्रार्थनास्थळात गेल्या होत्या. तेथे उपस्थित स्वयंसेवकांनी त्यांच्याकडून वीस रुपये घेऊन त्यांना प्लास्टिकच्या बाटलीत पाणी दिले, तसेच हे पाणी आजारी भागावर लावल्यास आजार बरा होईल असे सांगितले. त्यानंतर झालेल्या सभेत मुख्य धर्मगुरू केनेथ सिल्वे याने उपस्थितांना मार्गदर्शन करताना, शरीराच्या आजारी भागावर उजवा हात ठेवण्यास सांगून देव कर्करोग व ट्यूमर बरे करेल असा दावा केला. या संपूर्ण प्रकाराचे फियार्दी आणि त्यांच्या मैत्रिणीने मोबाईलवर चित्रीकरण सुरू केले असता तेथील महिला स्वयंसेवकांनी त्यांना तीव्र विरोध केला. आरोपींनी दोघींना धक्काबुक्की करत त्यांच्या मोबाईलमधील चित्रीकरण बळजबरीने डिलीट केल्याचे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा कसून तपास सुरू आहे.

अवैध मद्य तस्करीवर उत्पादन शुल्क विभागाची मोठी कार्यवाही

■डहाणू। प्रतिनिधी,

परराज्यातून महाराष्ट्रात होर्णाया अवैध मद्य तस्करीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने पालघर जिल्ह्यात मोठी संयुक्त कारवाई करत डहाणू आणि जव्हार तालुक्यातून १४२ बॉक्स विदेशी मद्यसाठा, तीन चारचाकी वाहने आणि एकूण ३४ लाख ८० हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ जून रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या डहाणू विभाग आणि भरारी पथक (पालघर) यांच्या संयुक्त पथकाने विविध ठिकाणी सापळे रचून ही धडक कारवाई केली. निरीक्षक सुनील देशमुख (डहाणू) आणि निरीक्षक अरुण चव्हाण (भरारी पथक, पालघर) यांच्या



नेतृत्वाखाली कासा-सायवन रोड, बेहेडपाडा (जव्हार) तसेच सोरळी-बेहेडपाडा परिसरात संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

तपासादरम्यान वाहनांमधून दादरा नगर हवेली येथे विक्रीसाठी असलेला मोठ्या प्रमाणातील विदेशी मद्यसाठा आढळून आला. पथकाने तात्काळ कारवाई करत मद्यसाठा आणि वाहने ताब्यात घेतली.या कारवाईत सुमारे ९ लाख ५० हजार रुपयांचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला असून वाहनांसह एकूण ३४ लाख ८० हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.ही कारवाई वरिष्ठ अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून निरीक्षक सुनील देशमुख, निरीक्षक अरुण चव्हाण आणि दुय्यम निरीक्षक विश्वजीत आभाळे पुढील तपास करीत आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यातील अवैध मद्य तस्करी रोखण्यासाठी अशा कारवाया आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

मुंबईत रशियन जहाजाला बेकायदेशीर इंधन पुरवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■मुंबई। प्रतिनिधी,

सीमाशुल्क विभागाच्या प्रतिबंधक विभागाने मुंबईच्या किनाऱ्याजवळ इंधन तस्करी आणि बेकायदेशीर इंधन हस्तांतरणात गुंतलेल्या एका मोठ्या नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. अधिकाऱ्यांनी सोमवारी (15 जून) प्रसारमाध्यमांना माहिती दिली की, या कारवाईदरम्यान निबंर्धांच्या कक्षेत असलेल्या रशियन ध्वजांकित जहाजाला आणि एका भारतीय ह्यबंकर बार्जल्ला (इंधन वाहून नेणारी बार्ज) अडवण्यात आले. भारतीय बार्जने परदेशी जहाजाला 'व्हेरी लो सल्फर फ्युएल ऑईल' पुरवल्याचा आरोप आहे. सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या मते, बनावट निर्यात कागदपत्रांचा वापर करून 'एमटी अंगारा' या रशियन जहाजाला सुमारे 200 टन VLSFO बेकायदेशीरपणे पुरवले जात होते. हे परदेशी जहाज सध्या अमेरिका, युरोपियन युनियन आणि युनायटेड किंगडम यांनी लादलेल्या निबंर्धांच्या कक्षेत आहे.

बनावट कागदपत्रांद्वारे सुरू होते रॅकेट

मुंबई सीमाशुल्क विभागाने निर्बंध घातलेल्या रशियन जहाज 'एमटी अंगारा' आणि भारतीय बार्ज 'एमव्ही बे III' यांचा समावेश असलेल्या एका कथित इंधन तस्करी नेटवर्कचा पदार्फाश केला आहे. अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार, बनावट निर्यात कागदपत्रांचा वापर करून २०० टन व्हीएलएसएफओ (VLSFO) पुरवण्यात आला होता आणि आता या प्रकरणाचा तपास संयुक्त अरब अमिराती (UAE) शी संबंधित संभाव्य व्यवहारांपर्यंत विस्तारला आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, नियमित गस्तीदरम्यान 'एमटी अंगारा' आणि 'एमव्ही बे-थ्री' ही भारतीय बार्ज अडवण्यात आली. या बार्जद्वारे परदेशी जहाजात इंधन हस्तांतरित केले जात होते. तपास अधिकाऱ्यांना असे आढळून आले की, इंधन पुरवठ्याची संपूर्ण प्रक्रिया 'इंडियन ऑईल'च्या नावाने बनवलेल्या बनावट निर्यात इनव्हॉइसचा वापर करून राबवली जात होती. असे करताना निर्यात शिपिंग बिले भरण्यासारख्या सीमाशुल्क विभागाच्या अनिवार्य प्रक्रिया आणि नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते. कर आणि देशांतर्गत शुल्क चुकवण्यासाठी या पद्धतींचा अवलंब केल्याचा आरोप अधिकाऱ्यांनी केला आहे.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, समुद्राच्या मध्यात इंधन हस्तांतरणासाठी वापरलेली बंकर बार्ज ही नवी मुंबईतील शिपिंग कंपनी चालवणाऱ्या एका व्यक्तीच्या मालकीची असल्याचे समजते. या इंधन तस्करीच्या नेटवर्कमधील सहभागाबद्दल या व्यक्तीची आधीच चौकशी सुरू आहे. सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी 'एमटी अंगारा'मधून थेट 'बंकर डिलिव्हरी नोट्स' आणि इंधन चाचणी अहवाल जप्त केले आहेत. त्यांच्या मते, ही कागदपत्रे जहाज आणि बेकायदेशीर इंधन पुरवठा यांच्यातील संबंध स्पष्टपणे सिद्ध करतात. प्राथमिक तपासातून असे दिसून आले आहे की, या संपूर्ण प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली बनावट कागदपत्रे आणि शिपिंग बिले नवी मुंबईतीलच एका लॉजिस्टिक्स कंपनीने तयार केली होती. या कंपनीच्या मालकांचाही सुरू असलेल्या तपासात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, कर चुकवण्याव्यतिरिक्त, या गुंतागुंतीच्या फसवणुकीच्या योजनेचा उद्देश निबंर्धांच्या कक्षेत असलेल्या रशियन जहाजाला केला जाणारा इंधन पुरवठा आंतरराष्ट्रीय देखरेख संस्थांपासून लपवणे हा असावा, असा सीमाशुल्क विभागाला संशय आहे. अधिकारी संयुक्त अरब अमिराती मधील कथित 'शेल कंपन्यांशी' (केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या कंपन्या) संबंधित बेकायदेशीर परदेशी व्यवहारांचीही चौकशी करत आहेत. तस्करी केलेल्या इंधनाचे पैसे या कंपन्यांच्या माध्यमातून वळवले गेल्याचा संशय आहे. स्थानिक साथीदार आणि परदेशी बँकिंग वाहिन्यांसह या नेटवर्कच्या सर्व पैलूंची सखोल चौकशी सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सुटकेसमध्ये कुजलेल्या अवस्थेत आढळला महिलेचा मृतदेह

धक्कादायक घटनेनं... नाशिकमध्ये भीतीदायक वातावरण



■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसरात विकासकामं जोरदार सुरु आहे. पण अशातच आज सकाळी 16 जून मंगळवारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तपोवन परिसरतील केवडी बन इथे असलेल्या कृषी गो सेवा ट्रस्ट गोशाळेजवळ एक सुटकेस आणि गोणी आढळली आहे. यात अत्यंत क्रूरपणे दुर्गंध अवस्थेत मृतदेह आढळला आहे. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी या परिसरात काम करणाऱ्या ग्लोबल कंपनीच्या कर्मचाऱ्यांना अचानक तीव्र दुर्गंधी जाणवली. त्यामुळे त्यांनी शोध घेतला असताना त्यांना एक संशयास्पद सुटकेस आणि गोणी आढळून आली. ती उघडून पाहिल्यावर त्यांना धक्काच बसला कारण त्यात एका महिलेचे मृतदेह होतं. त्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ या घटनेची माहिती नाशिक पोलिसांना दिली.

या घटनेनंतर नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली असून घटनास्थळी पोलिसांकडून पंचनामा करण्यात आला आहे. हा मृतदेह नेमका कोणत्या महिलेचा आहे या संदर्भात पोलिसांकडून माहिती घेतली जात असून फॉरेन्सिक टीम कडून तपास केला जात आहे. पोलिसांना प्रथमदर्शनी असा अंदाज आहे की, चार ते पाच दिवसांपूर्वी हत्या करुन त्या महिलेचा मृतदेह सुटकेसमध्ये या परिसरात फेकण्यात आला आहे. पंचवटी पोलीस या हत्येचा तपास करत आहेत.

दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण आणि मृत्यू कधी झाला, हे शोधण्यासाठी मृतदेह शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून त्यानंतरच पोलीस याबद्दल सांगणार आहे. तसंच या महिलेच्या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांकडून परिसरातील आणि जिल्ह्यातील बेपत्ता व्यक्तींच्या नोंदी तपासल्या जात आहेत. धक्कादायक म्हणजे नाशिकमध्ये कुंभ सिंहस्थाच्या कामांमुळे सध्या तपोवन परिसरात मजुरांची आणि नागरिकांची मोठी वर्दळ गेल्या अनेक महिन्यांपासून पाहिला मिळत आहे. अशा गजबजलेल्या भागात सुटकेसमध्ये गोणीत भरलेला मृतदेह आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. तसंच एवढी गर्दीच्या परिसरात ही घटना झाली कशी याचा शोध पोलीस घेत आहेत.

दरम्यान जानेवारी महिन्यात नाशिकच्या पंचवटी परिसरातील हिरावाडी इथेदेखील एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. पोलिसांनी सांगितलं होतं की, राहत्या घरातून बेपत्ता झालेल्या एका 56 वर्षीय महिलेचा तो मृतदेह होता. भारती माणिक वल्टे असे मृत महिलेचे नाव होते.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

युद्धसज्ज भारत



लीना मकरंद गाडगीळ स्वीडनच्या 'सिप्री' संस्थेच्या अहवालानुसार भारताकडे असलेल्या सुमारे १९० अण्वस्त्रांपैकी १२ अण्वस्त्रे सक्रिय तैनातीच्या स्थितीत आहेत. हा बदल भारताच्या अण्वस्त्र धोरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

भारताने विकसित केलेली अण्वस्त्रे केवळ प्रतिबंधात्मक शक्ती म्हणून साठवून ठेवलेली नसून, गरज पडल्यास वापरासाठी सज्ज ठेवण्याच्या दिशेने धोरणात्मक बदल झाल्याचे या अहवालातून दिसून येते. यापूर्वीच्या सिप्रीच्या अहवालांमध्ये भारताच्या अण्वस्त्र क्षमतेचा उल्लेख प्रामुख्याने 'साठा' म्हणून केला जात होता. मात्र, सध्याच्या अहवालात काही अण्वस्त्रे तैनातीसाठी सज्ज असल्याचे नमूद करण्यात आले. यामुळे भारताच्या अण्वस्त्र धोरणातील बदलाकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधले. आंतरराष्ट्रीय सुरक्षा, सैनिकी खर्च आणि शस्त्रास्त्रांच्या प्रसारासंदर्भातील अभ्यासासाठी सिप्री ही जगातील स्वतंत्र संशोधन संस्था मानली जाते. १९६६ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या संशोधनात वस्तुनिष्ठता आणि वैज्ञानिक पद्धतीला महत्त्व दिले जाते. त्यामुळे भारताच्या अण्वस्त्र क्षमतेबाबत केलेल्या निरीक्षणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त होते. अहवालानुसार, भारताची अण्वस्त्रे विविध वाहक प्रणालींशी, जसे की क्षेपणास्त्रे, नौदलातील साधने आणि इतर संरक्षण यंत्रणा जोडण्याच्या क्षमतेसह सज्ज ठेवली जात आहे. याचा अर्थ असा की भारतावर अण्वस्त्र हल्ल्याचा धोका निर्माण झाल्यास, प्रतिउत्तर देण्याची क्षमता भारताने कायम ठेवली आहे. भारताचे अण्वस्त्र धोरण हे मुख्यतः प्रतिबंधात्मक तत्त्वावर आधारित आहे. देशाच्या सुरक्षेसाठी सक्षम संरक्षण व्यवस्था असणे आवश्यक आहे, ही भूमिका अनेक विचारवंतांनी मांडली आहे. 'सावरकरांची ऐतिहासिक वक्तव्ये' या पुस्तकात सावरकरांनी संरक्षण सज्जतेबाबत मांडलेली दूरदृष्टी आणि विचार याच संदर्भात अभ्यासता येतात. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर झालेल्या ताश्कंद कराराच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारताने केवळ मैत्रीपूर्ण संबंधांवर अवलंबून न राहता आधुनिक संरक्षण क्षमता, अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रांसह मजबूत सुरक्षा व्यवस्था उभी करावी, असा विचार मांडला होता. आजही मजबूत संरक्षण क्षमता आणि आक्रमणाला सक्षम प्रत्युत्तर देण्याची गरज या भूमिकेतून दिसून येते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या ''यह नया भारत है, यह घर में घुसेगा भी और मारेगा भी'' या वक्तव्याप्रमाणे, सर्जिकल स्ट्राइक २०१६, बालाकोट एअर स्ट्राइक २०१९ आणि गलवान संघर्ष २०२० यांसारख्या घटनांमधून भारताच्या बदलत्या संरक्षण धोरणाचे दर्शन घडते. हे धोरण केवळ बचावात्मक नसून गरज पडल्यास ठोस प्रत्युत्तर देण्याच्या ''आक्रमक बचाव'' या संकल्पनेवर आधारित असल्याचे समर्थक मानतात. अलीकडे भारताच्या वीर जवान प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले. त्यांची माता शालू जंजाळ यांना पुरस्कार स्वीकारताना अनावर झालेले अश्रू आणि द्रौपदी मुर्मू यांनी केलेले सांत्वन हे अत्यंत भावनिक क्षण होते. अशा बलिदानांच्या स्मृती देशाच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक घटकाला अधिक दृढ निश्चयाने पुढे जाण्याची प्रेरणा देतात. राष्ट्राची सुरक्षा, सैन्याची सज्जता आणि जवानांचे बलिदान यांचा आदर राखत भारताने शांततेसोबतच आपल्या संरक्षण क्षमतेलाही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सिप्रीच्या अहवालातील बारकावे पाहिल्यास असे दिसून येते की, लष्करी महाशक्ती असलेले रशिया, अमेरिका, युनायटेड किंगडम, फ्रान्स आणि चीन आपली अण्वस्त्र क्षमता सतत मजबूत करत आहेत. चीनकडे भारताच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात अण्वस्त्रे आहेत. भारतानेही आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने अण्वस्त्र क्षमता आणि प्रतिरोधक क्षमता वाढवण्यावर भर दिला आहे. चीनकडून भारताच्या सीमेजवळ क्षेपणास्त्र तळ आणि लष्करी पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत. तिबेट आणि इतर सीमावर्ती भागातील या हालचाली भारतासाठी चिंतेचा विषय ठरतात. चीनकडे असलेल्या डीएफ-२६ सारख्या दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांमुळे आशियातील सामरिक समीकरण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे, तर भारतानेही अण्वस्त्र क्षमतेत वाढ केली आहे. ही वाढ केवळ संख्यात्मक नसून, सुरक्षितता, तंत्रज्ञान आणि दुसऱ्या फटक्याची क्षमता मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताच्या संरक्षणविषयक विचारसरणीत काही महत्त्वाचे बदल दिसून आले. संरक्षण तज्ज्ञांच्या मते, कोणत्याही अणुयुद्धात मोठ्या प्रमाणातील विनाश घडवण्यासाठी तुलनेने मर्यादित संख्येतील अण्वस्त्रेही पुरेशी ठरू शकतात. त्यामुळे अण्वस्त्रांची संख्या वाढवण्यापेक्षा त्यांची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि योग्य वेळी प्रतिकार करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरते. पाकिस्तानकडून वेळोवेळी अण्वस्त्रांचा उल्लेख करून दिल्या जाणाऱ्या धमक्या लक्षात घेता भारतासाठी विश्वासार्ह अणू प्रतिरोधक क्षमता राखणे आवश्यक आहे. भारताचे 'नो फर्स्ट युज' हे धोरण दीर्घकाळापासून चर्चेचा विषय राहिले. काही तज्ञांच्या मते बदलत्या सुरक्षा परिस्थितीत या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे, तर काहींच्या मते हे धोरण भारताची जबाबदार अणुशक्ती म्हणून ओळख निर्माण करते. त्यामुळे या विषयावर राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यापक दृष्टिकोनातून विचार होणे गरजेचे आहे. शांतता टिकवण्यासाठी केवळ युद्ध टाळण्याची इच्छा पुरेशी नसते; त्यासाठी प्रभावी संरक्षण क्षमता आणि सज्जता आवश्यक असते. अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांनीही मजबूत संरक्षण क्षमतेचे महत्त्व अधोरेखित केले होते. दक्षिण आशियातील बदलते राजकीय समीकरण, चीन-पाकिस्तान जवळीक, बांगलादेशातील घडामोडी, नेपाळमधील चीनचा वाढता प्रभाव आणि पाकिस्तानचा अंतराळ व संरक्षण क्षेत्रातील विस्तार या सर्व गोष्टी भारतासाठी नवीन आव्हाने निर्माण करत आहेत. जागतिक पातळीवर चीन-अमेरिका स्पर्धा, रशिया-चीन संबंध आणि 'क्वाड'सारख्या आघाड्या यामुळे आशियातील सामरिक वातावरण अधिक गुंतागुंतीचे झाले. अशा परिस्थितीत भारताने सावध, संतुलित आणि दीर्घकालीन धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. स्वसंरक्षणासाठी आवश्यक लष्करी क्षमता वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि विश्वासार्ह प्रतिरोधक क्षमता निर्माण करणे हा भारतासाठी अपरिहार्य मार्ग आहे. मात्र त्याच वेळी शांतता, जबाबदार अणू धोरण आणि राजनैतिक प्रयत्न यांनाही तितकेच महत्त्व राहणार आहे.

विनोदी शैली जपाणर कोण?



विनोदी कलाकार प्रणित मोरे याच्या कार्यक्रमातील काही आक्षेपार्ह व्हिडिओ सामाजिक माध्यमांत मोठ्या प्रमाणात प्रसारित झाले होते. प्रणितवर, तसेच त्याच्यासह अन्य एक तरुण आणि एक आधुनिक वैद्य तरुणी यांच्यावरही टीका करण्यात आली. यानंतर घाबरल्याचे नाटक करत आणि उपरती आल्याचे दर्शवत त्या सर्वांनी सार्वजनिक क्षमायाचनेचा सोपस्कार पार पाडला. प्रणितने तर 'मी या सगळ्याला कसा उत्तरदायी आहे? मला एक संधी द्या, मी चांगला माणूस बनवून दाखवीन', असे शाब्दिक गोडवे गाऊन सहानुभूती मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. ज्यांना अशा विनोदी कलाकारांचा पुळका येत असेल, त्यांना 'ही संधी देणे कसे आवश्यक आहे', असेच वाटेल. प्रणितनंतर आणखी एका विनोदी कलाकाराविषयीचे वृत्त पसरले. मधुर विर्ली नामक कलाकाराने एका कार्यक्रमात बलात्कारासारख्या संवेदनशील विषयाचाच विनोद केला होता. त्यामुळे त्याच्यावरही टीका झाली. गेल्या वर्षी रणवीर अलाहाबादिया किंवा समय रैना यांच्याही कार्यक्रमांच्या संदर्भात असे घडले होते. त्यामुळे काही महिने त्यांच्या कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली. कालांतराने सर्वकाही सुरळीत झाल्यावर 'ये रे माझ्या मागल्या' चालू झाले. प्रणितचेही असेच काहीसे होईल. आजच्या काळातील सर्वच आधुनिक विनोदी कलाकारांना एका मापाने मोजता येणार नाही; पण लोकप्रियतेच्या नावाखाली काही जणांकडून अश्लीलतेचा अतिरेक केला जातो. या प्रकरणांच्या अनुषंगाने मराठी भाषेतील विनोदाची परंपरा, सध्याच्या काळातील विनोदाचा पालटलेला चेहरा आणि समाजाची अभिरूची यांच्या दृष्टीने चर्चा होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राला विनोदाची अत्यंत समृद्ध परंपरा लाभली आहे. मराठी साहित्य आणि संस्कृती यांच्यातील 'विनोदा'तून करमणूक तर केली जात असे; पण त्यातून समाजप्रबोधन अन् आत्मपरीक्षण हेही साध्य होत असे. व्यक्तीच्या आयुष्यातील दुःखावर या विनोदांमुळे हलकी फुंकर घातली जायची. मराठीतील साहित्यिकांमध्ये पु.ल. देशपांडे, द.मा. मिरासदार, चिं.वि. जोशी आदींनी विनोदाला सुसंस्कृत आणि विचारप्रवर्तक रूप दिले. त्यांच्या साहित्यामुळे लाखो वाचक खळखळून हसले. अजूनही त्यांची प्रकाशने वाचतांना त्या मार्मिक विनोदांतून प्रत्येक जण समाधानी हास्य अनुभवतो. त्या विनोदाचा मनमुराद आनंद घेतो. पु.ल. यांचेही लेखन उपरोधिक असे; पण त्यांनी कधीही कुणा व्यक्तीचा अपमान केला नाही. द.मा. मिरासदार यांनी त्यांच्या कथांतून ग्रामीण जीवनातील गमतीजमती रेखाटल्या; पण त्यातही माणसांचा आदर होता. त्या हास्यातून ते विचारांना प्रवृत्त करत. जीवनातील दुःखे किंवा संघर्ष यांच्यावर त्यांच्या विनोदाचा शिडकावा पडल्यास वाचकांचे मन प्रसन्न होई. या विनोदविरांना लोक किंवा प्रेक्षक यांना हसवण्यासाठी कधीही कमरेखालच्या विनोदांचा आधार घ्यावा लागला नाही, ना त्यांनी कधी तसा विचारही केला. अश्लीलता, लैंगिक सूचकता किंवा अपमानास्पद भाषा यांचा वापर न करता त्यांनी मराठी रसिकांच्या मनात अढळ स्थान मिळवले. आजही 'पु.ल. देशपांडे' हे नाव ऐकताच मराठी माणसाच्या चेहऱ्यावर निखळ हास्य उमटते, ही त्यांच्या शुद्ध विनोदांचीच परिणती आहे. त्यांच्या विनोदात निरीक्षणशक्ती आणि भाषासौंदर्य दडलेले होते. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितक्याच आवडीने वाचले जाते. 'खरेतर सगळे कागद सारखेच; पण त्याला अहंकार चिकटला की, त्याचे प्रमाणपत्र होते', या त्यांच्या 'अपूर्वाई' नावाच्या साहित्यातील एका वाक्यातून त्यांनी समाजातील दिखाऊ प्रतिष्ठेवर उपरोधिक भाष्य केले; पण त्यात अश्लीलता नव्हती. टीका होती; पण व्यक्तीद्वेष नव्हता. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली'मध्ये तर त्यांनी अनेक पात्रे रंगवली. त्यांतही विनोद आहेत; पण अश्लीलता नाही! उपरोधिकता आहे; पण कटुता नाही. त्यांच्या विनोदांचे वैशिष्ट्य म्हणजे ते एखाद्या व्यक्तीची खिल्ली उडवत नसत, तर त्या व्यक्तीला 'आपण सगळेच थोडेफार असे असतो', असे दाखवत. त्यामुळे वाचक हसतो आणि त्याच वेळी स्वतःलाही त्या विनोदात पहातो. ही मराठी भाषेतील विनोदप्रकारांची समृद्धता आहे. त्याला गालबोट लागेल, असा एकही शब्द या साहित्यिक मंडळींकडून कधीच आला नाही. त्यांनी समाजाला मनमुरादपणे हसायला शिकवून विनोदी साहित्याचा वारसा जपला.

आजच्या डिजिटल युगात विनोदाचा स्तर दिवसेंदिवस खालावत आहे. विनोद म्हणजे अपमान, विकृती, शिवीगाळ, अश्लीलता, गलिच्छपणा हेच समीकरण झालेले आहे. विनोदाची भाषा पूर्णपणे पालटली आहे. विनोदाचे खरे मर्म समजून घेण्याची क्षमता संपुष्टात आली आहे. हल्ली साध्यासोप्या विनोदातून कुणालाच हसू येत नाही; पण कमरेखालचा विनोद केला की, त्यातून आसुरी आनंद घेता येतो. ही विकृतीची परिसीमा आहे. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी इतक्या खालच्या थराला येणे, हे किती चुकीचे आहे? लाज-लज्जा सर्व काही खुंटीला टांगून अशा कार्यक्रमांना तरुण वर्ग शुल्क भरून मोठ्या प्रमाणात उपस्थित रहातो. कधी एकदा अश्लील विनोद होतो आणि आपण हसतो, असे त्यांना होते. एकाचे ७० टक्के प्रमाणात अश्लील बोलणे झाले, तर त्याला वरचढ ठरण्यासाठी दुसऱ्याकडून बोलतांना अश्लीलतेचे टोक गाठले जाते. ही सर्व मंडळी शिक्षित आहेत बरं का ! शिक्षण ते सद्वर्तन हा मोठा प्रवास संस्काराच्या शिडीनेच पार करता येतो. संस्कार नसतील, तर एखाद्याच्या उच्च विद्याविभूषित असण्याला काहीच मूल्य रहात नाही. यातून शिक्षणाचेच धिंडवडे निघतात. अशी विकृत मानसिकतेची तरुण पिढी देशाला कुठे नेणार आहे, याचा विचारही करवत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या आयोजनावर देशभरात बंदी आणायला हवी.

पूर्वीचे लेखक आणि साहित्यिक यांचे साहित्य आज लोप पावत चालले असल्याने त्यांची नावेही सध्याच्या पिढीला ठाऊक नाहीत. पांचट विनोद करून सर्वांना हसवणारेच त्यांच्या दृष्टीने खरे साहित्यिक होत. 'विनोद म्हणजे मानवी जीवनाकडे पहाण्याचा संवेदनशील दृष्टीकोन' हे शिकवर्णाया साहित्यिकांची आज समाजाला आवश्यकता आहे. विनोदाची व्याख्या अधिक परिपक्व होण्यासाठी समाजात साहित्यवाचन, वक्तृत्व, नाट्यस्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित करायला हवेत. समाजमनाला आरसा दाखवणारा, तणाव न्यून करणारा, विचारांना चालना देणारा तो विनोद ! विनोदाची पातळी घसरू न देता तो दर्जेदार करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. त्यातून समाजात सकारात्मकता, विवेक आणि संवेदनशीलता वाढेल. विनोदाची समृद्ध परंपरा अधिक बळकट करण्यासाठी ती शैली जपायला हवी. विनोदाची हत्या करून चालणार नाही, हे विनोदी कलाकारांनी लक्षात ठेवावे आणि खरे 'विनोदवीर' व्हावे !

स्टँडअप कॉमेडीतील विकृती

स्टँडअप कॉमेडियन प्रणित मोरे सध्या त्याच्या एका शोमधील 370 रुपयांच्या बियाणीच्या वादावरून अडचणीत सापडला आहे. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या कथित अश्लील आणि आक्षेपार्ह मजकुराप्रकरणी महाराष्ट्र सायबरने प्रणित मोरे, हिमांशू जांगरा, डॉ. सेजल पवार आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मुळात स्टँडअप कॉमेडी हा प्रकार सत्तेला प्रश्न विचारणारा, समाजाच्या ढोंगीपणाला आरसा दाखवणारा आणि आपल्याला अस्वस्थ करणाऱ्या वास्तवांशी खेळत त्यांच्यावर विचार करायला भाग पाडणारा असतो. तो केवळ हसवण्यासाठी नसतो; तो टोचतो, खुपसतो, उघड करतो. म्हणूनच जॉर्ज कार्लिनपासून ते अनेक समकालीन विनोदी कलाकारांपर्यंत सत्ताधारी, बहुसंख्य, विशेषाधिकारप्राप्त आणि सामाजिक वर्चस्व उपभोगणाऱ्यांवर प्रहार करण्याची एक परंपरा दिसते. पण आपल्याकडे अनेकदा याच्या नेमके उलट घडताना दिसते. येथे विनोदाच्या नावाखाली दुर्बलांवर, स्त्रियांवर, अल्पसंख्याकांवर, त्यांच्या अनुभवांवर आणि त्यांच्या मानवी प्रतिष्ठेवर पंच मारले जातात. त्या पंचला धाडस, बिनधास्तपणा किंवा 'डार्क ह्युमर' म्हणून गौरवले जाते. प्रणित मोरेच्या कार्यक्रमात हिमांशू जांगराने केलेले कथन हे याच प्रवृत्तीचे एक अत्यंत उघडीबोडके आणि अस्वस्थ करणारे उदाहरण आहे. प्रणितच्या कार्यक्रमात हिमांशूने सांगितले की, तो एका मुलीला डेटवर घेऊन गेला. त्याला तिला हॉटेलमध्ये न्यायचे होते, तिने नकार दिला. मग तो तिला बागेत घेऊन गेला. त्याने तिच्यावर खर्च केला, तिला 370 रुपयांची बिर्याणी खाऊ घातली. त्याबदल्यात तिच्याकडून शरीरसुख मिळणे हा आपला हक्कच आहे, अशा थाटात त्याने कथन केले. पुढे त्या मुलीच्या शरीरासोबत काय केले, कसे केले, याची जवळपास चवीने केलेली वर्णनेही रंगवली गेली. सभागृहात हास्य पिकले. टाळ्या वाजल्या. प्रणितनेही त्याला 'ले ले, ले ले' म्हणत आणखी बोलते केले. या प्रसंगात सगळ्यात भीतीदायक गोष्ट म्हणजे त्या सभागृहात उपस्थित असलेल्या अनेक पुरुषांना यात काहीच गैर वाटले नाही. उलट, हे त्यांना रिलेटेबल वाटले. 'मी बिर्याणी खाऊ घातली, म्हणून माझे काहीतरी तिच्याकडून घेणे आहे,' हा विचार म्हणजे स्त्रीला मनुष्य न मानता व्यवहारातील वस्तू मानण्याचा विचार. जणू काही ती एखादी सेवा पुरवत आहे आणि पुरुषाने तिच्यासाठी खर्च केलेला पैसा म्हणजे त्याची गुंतवणूक आहे, ज्यावर त्याला परतावा हवा आहे. ही भाषा गलिच्छ आहेच, शिवाय ती धोकादायक आहे. यात प्रणित मोरेची भूमिका अधिक गंभीर ठरते. तो त्या तरुणाला थांबवू शकला असता. पण त्याने उलट त्या कथनाला खतपाणी घातले. खरे तर, विनोद हा समाजाचा आरसा असतो, असे म्हटले जाते. पण आरसा वास्तव दाखवतो की विकृतीचे समर्थन करतो, हेही तितकेच महत्त्वाचे असते. एखाद्या विनोदाचा केंद्रबिंदू जर स्त्रीच्या अस्तित्वाची टिंगल, तिच्या स्वायत्ततेची खिल्ली किंवा तिच्या मानवी प्रतिष्ठेचे अवमूल्यन असेल, तर तो केवळ विनोद राहत नाही; तो एका खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रदर्शन ठरतो. प्रत्येक वेळी स्त्रीला विनोदाचा विषय बनवले जाते, तेव्हा तिचे व्यक्तिमत्त्व दुय्यम ठरवून तिच्या शरीराला आणि तिच्या अस्तित्वाला प्राथमिकता दिली जाते. स्त्री ही आई आहे, बहीण आहे, पत्नी आहे म्हणूनच तिला सन्मान मिळायला हवा का? की ती सर्वप्रथम एक स्वतंत्र नागरिक, विचार करणारी व्यक्ती आणि स्वतःच्या अस्तित्वाची मालकीण आहे म्हणून तिचा आदर व्हायला हवा? दुर्दैवाने आपण अजूनही पहिल्या टप्प्यात अडकलो आहोत. स्त्रीशी संबंधित प्रत्येक गोष्ट पुरुषांच्या नातेसंबंधांच्या चौकटीतूनच मोजली जाते. तिच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्र मूल्य देण्याची तयारी समाजाने अद्याप पूर्णपणे दाखवलेली नाही. स्त्रीला उपभोगाच्या साधनाच्या चौकटीत अडकविणे ही नवी गोष्ट नाही. जाहिरातींपासून चित्रपटांपर्यंत, गाण्यांपासून सोशल मीडिया कंटेंटपर्यंत तिच्या शरीराचा वापर ग्राहक आकर्षित करण्यासाठी केला गेला. तिच्या बुद्धिमत्तेपेक्षा तिच्या दिसण्याला महत्त्व देण्यात आले. तिच्या कर्तृत्वापेक्षा तिच्या बाह्यरूपावर चर्चा झाली. मग समाजाने हे इतके सहज स्वीकारले की त्यातील विकृतीच दिसेनाशी झाली. याचा अर्थ असा नाही की विनोद बंद व्हावेत किंवा कलाकारांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य गमवावे. उलट, विनोद अधिक धारदार, अधिक बौद्धिक आणि अधिक संवेदनशील होऊ शकतो. समाजातील विसंगतींवर भाष्य करता येते, सत्तेला प्रश्न विचारता येतात, व्यवस्थेवर उपहास करता येतो. पण एखाद्या घटकाच्या मानवी प्रतिष्ठेची किंमत मोजून मिळविलेल्या टाळ्या या शेवटी स्वस्त लोकप्रियतेचे प्रतीक ठरतात. 370 रुपयांच्या बिर्याणीवरून सुरू झालेल्या या वादात खरा प्रश्न बिर्याणीचा नाही. प्रश्न आहे, आपण स्त्रीला कोणत्या नजरेने पाहतो याचा. तिच्या स्वाभिमानापेक्षा आपल्याला विनोद महत्त्वाचा वाटतो का? तिच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा तिचे वस्तुकरण आपल्याला अधिक सहज वाटते का? सर्वात महत्त्वाचे म्हणजे, समाज म्हणून आपण अजूनही स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारले आहे का? स्त्री ही उपभोगाची वस्तू नाही. ती कोणाच्याही मनोरंजनासाठी उपलब्ध ठेवलेली प्रतिमा नाही. ती स्वतंत्र विचारांची, भावना असलेली, स्वप्ने पाहणारी आणि स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार असलेली व्यक्ती आहे. तिच्या प्रतिष्ठेची किंमत कोणत्याही बिर्याणीपेक्षा, कोणत्याही विनोदापेक्षा आणि कोणत्याही टाळ्यांपेक्षा कितीतरी मोठी आहे.

'जय'शंकर!

भारताचे परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी त्यांच्या युरोप दौऱ्याच्या वेळी धुरंधरपणे प्रत्युत्तर देणे म्हणजे काय असते ? हे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देतांना दाखवून दिले आहे. 'काही देश युरोपकडून शस्त्रे विकत घेतात आणि भारतावर आक्रमण करतात. भारताकडून कधी असे झाले आहे का? याविषयी तुमचे काय म्हणणे आहे? हे नैतिकदृष्ट्या योग्य आहे का?', असे प्रत्युत्तर पत्रकाराला देऊन त्याचे आणि इतरांचे तोंड बंद केले. फिनलँड येथे परिषदेत एक पत्रकार एस. जयशंकर यांना खोदून खोदून प्रश्न विचारत होता, 'तुम्ही रशियाच्या समवेत सहानुभूती बाळगता, हे आम्हा युरोपियन लोकांना दुःखद वाटते. नैतिकदृष्ट्या योग्य वाटत नाही. तेल खरेदी करता, ते योग्य आहे का?' 'भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे', या सूत्रावर वारंवार प्रश्न विचारले जातात आणि भारताच्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित केला जातो. यामुळे साहजिकच भारताची अपकीर्ती होते. असे असले, तरी प्रश्न विचारणाऱ्यांचे देश कोणती नैतिकता जपतात? हासुद्धा प्रश्न आहे. याच विषयावर मागील वेळीही विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले होते, 'मी जर युरोपकडून रशियन तेल खरेदीचे आकडे पाहिले, तर युरोप जेवढे तेल एका दुपारमध्ये खरेदी करतो, तेवढे भारत एका महिन्यातही खरेदी करत नाही. माझ्या देशाचे उत्पन्न मर्यादित आहे आणि मला माझ्या देशातील नागरिकांना स्वस्त दरात इंधन देणे, हे माझे कर्तव्य आहे', असे ठासून सांगितले. आंतरराष्ट्रीय व्यासपिठांवर पाश्चात्त्य देशांचा दुटप्पीपणा उघडा पाडणे असो किंवा भारताची बाजू ठामपणे मांडणे असो, डॉ. एस. जयशंकर यांच्या बोलण्यात कमालीचा आत्मविश्वास आणि मुत्सद्दीपणा दिसून येतो. काँग्रेस सरकारच्या काळापर्यंत भारतावर अनेक देशांचा ज्यामध्ये अमेरिका, युरोप खंडातील देश, रशिया, चीन इत्यादी अलिखित, लिखित दबाव होता. या देशांनी त्यातही महासत्ता अमेरिका अन् बलाढ्य देश ज्यामध्ये फ्रान्स, इटली, जर्मनी यांच्या सोयीनुसार वागण्याचा सुप्त दबाव भारतावर असे. त्यामुळे पाकने भारतावर कितीही आतंकवादी आक्रमणे केली, तरी भारतीय शासनकर्त्यांना अमेरिकेने एकदा 'नाही' सांगितले, तर त्यानुसार निमूटपणे भारत प्रतिआक्रमण करत नसे. नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी आले आणि काळ पालटला. भारत कुणाच्याही दबावाला वा आंतरराष्ट्रीय दबावाला भीक न घालता पाकविरोधात धडक कृती करू लागला. कॅनडा, चीन यांसह जगभरातील बलाढ्य देशांनाच चोख राजनैतिक प्रत्युत्तर देऊ लागला. परराष्ट्र विभागात कार्यरत असलेले आणि पुष्कळ अनुभव असलेले परराष्ट्र सचिव डॉ. एस. जयशंकर हे परराष्ट्रमंत्री बनले. त्यांचा या विभागात असलेला दांडगा अनुभव आणि कमालीचे संवादकौशल्य यांच्या उपयोगाने परराष्ट्र विभाग अतिशय भक्कम स्थितीत आला. एरव्ही 'परराष्ट्र विभाग काय काम करतो?', असा प्रश्न भारतियांना पडत असे. आखाती देशात फाशीची शिक्षा झालेल्या ८ भारतियांची शिक्षा रहित करून त्यांना पुन्हा सन्मानाने भारतात आणण्याचा विषय असो, कॅनडासारख्या भारताशी पूर्वग्रह ठेवून वागणाऱ्या देशाला दमात घेऊन त्यांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांची देशातून हकालपट्टी करण्याचा विषय असो, एकाच वेळी जगातील अमेरिका आणि रशिया, इराण, तालिबानशासित अफगाणिस्तान, आखाती देश यांच्याशी सलोख्याचे अन् व्यापारी संबंध ठेवण्याचा विषय असो. भारताच्या परराष्ट्र विभागाने बुद्धी आणि धोरण कौशल्याची चुणूक दाखवली आहे. २ देशांमधील युद्धाच्या स्थितीतही भारताने त्यांच्याशी राजनैतिक आणि व्यापारी संबंध तसेच ठेवून जगाला आश्चर्याचा धक्का दिला आहे. या सर्व पालटाच्या केंद्रस्थानी आहेत डॉ. एस. जयशंकर ! त्यांनी स्वतःच्या पुस्तकात आणि भारतातील अनेक व्यासपिठांवर हे मान्य केले आहे की, भारताची सध्याची परराष्ट्रनीती ही रामायण अन् महाभारत यांच्यावर आधारित आहे. मारुति आणि श्रीकृष्ण हे भारताच्या परराष्ट्रनीतीचे आदर्श आहेत. यानुसार एस. जयशंकर यांनी अनेक जागतिक व्यासपिठावर भारताविषयी अनेक आक्षेप घणाघाती युक्तीवाद करून मोडून काढले आहेत. युरोपमध्ये २ वर्षांपूर्वी झालेल्या सार्वजनिक संवादाच्या कार्यक्रमात भारत कोणत्या बाजूला जाणार? भारत कधी जागतिक राजकारणात उतरणार कि केवळ कुंपणावर बसून पहात बसणार का? असे अनेक खोचक प्रश्न विचारले होते. तेव्हा जयशंकर यांनी सांगितले होते, 'युरोप अजूनही जुन्या मानसिकतेत आहे. युरोपला त्याचे प्रश्न हे जगाचे प्रश्न वाटतात; मात्र प्रत्यक्षात जगाचे प्रश्न वेगळे आहेत. युरोपने त्याची मानसिकता पालटावी', असे खडसावले. त्याचप्रमाणे त्यांनी पुढे असेही सांगितले, 'भारताने या देशांसमवेत जावे, त्या देशांसमवेत जावे, याची आम्हाला काही आवश्यकता नाही. भारत जगातील मोठी लोकशाही आहे, आमच्यात क्षमता आहे. आम्ही आमची धोरणे, उद्दिष्टे स्वतः का ठरवू शकत नाही?' त्यांच्या या उत्तरांनी त्यांनी अनेक दशकांपासून चालत आलेल्या पाश्चात्त्य देशांच्या वर्चस्ववादी मानसिकतेवर थेट प्रहार करत भारताचे अस्तित्व अधोरेखित केले.

बेस्ट-एसटी संघर्ष गडद



मुंबई आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक व प्रशासकीय तणावाखाली आहे. दोन्ही संस्थांमध्ये निधीअभाव, तोटा, वेतन व निवृत्ती लाभांचे प्रश्न आणि कर्मचारी असंतोष यामुळे अडचणी वाढल्या. यामुळे प्रवासी सेवांच्या सातत्यावर आणि कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे.

मुंबई आणि महाराष्ट्राची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सध्या एका निर्णायक टप्प्यावर उभी आहे. एका बाजूला बेस्ट उपक्रमाच्या आर्थिक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे, तर दुसऱ्या बाजूला एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांमध्ये शासनाच्या भूमिकेबाबत तीव्र असंतोष वाढताना दिसत आहे. या दोन्ही सेवांतील कर्मचारी आणि कामगार संघटना आता अधिक आक्रमक भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. हा संघर्ष अधिक तीव्र झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम विशेषतः पावसाळ्याच्या काळात मुंबईकर तसेच महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांना भोगावे लागू शकतात. अलीकडेच बेस्ट उपक्रमाला देण्यात येणाऱ्या एक हजार कोटी रुपयांच्या अनुदानाचा प्रस्ताव मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीने रोखून धरला. समितीने आतापर्यंत देण्यात आलेल्या सुमारे १२,३०० कोटी रुपयांच्या अनुदानाचा सविस्तर हिशेब सादर करण्याची मागणी केली आहे.

बेस्टची आर्थिक स्थिती अद्यापही सुधारत नसल्याने या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भाडेतत्त्वावरील बससेवा, वाढते अपघात, किमी-आधारित कंत्राटी व्यवस्था आणि त्यावरील वाढता खर्च यावरही सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे. या घडामोडींमुळे बेस्टमधील कर्मचारी संघटनांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. आर्थिक संकटासाठी कामगार जबाबदार नसताना त्याचा फटका मात्र सध्याच्या तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांनाच बसत असल्याचे कर्मचारी म्हणत आहेत. निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, वेतन कराराची अंमलबजावणी, कंत्राटी कामगारांचे प्रश्न, रिक्त पदांवरील भरती आणि स्वमालकीच्या बसेसची संख्या वाढविणे या मागण्या दीर्घकाळ प्रलंबित आहेत. त्यामुळे बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने १८ जून रोजी दादर येथे महासभा आयोजित करून व्यापक

स्टफ कॅप्सिकम



साहित्य : ४ लहान भोपळी मिरच्या, १/४ कप मटार, १/४ कप उकडलेले मक्याचे दाणे, १/२ कप पनीरचे लहान चौकोनी तुकडे, १/४ कप कांदा, बारीक चिरून, १/४ कप गाजर, लहान चौकोनी तुकडे, १/२ टीस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून धनेपूड, १/२ टीस्पून जिरेपूड, १४ टीस्पून लाल तिखट, १/४ कप नारळाचे दुध, चवीपुरते मीठ, २ मध्यम बटाटे, उकडून कुस्करलेले, १ टेस्पून + ३ टेस्पून तेल,

पाककृती : कढईत १ टेस्पून तेल गरम करावे. त्यात कांदा आणि गाजर घालून मिनिटभर परतावे. झाकण ठेवून २-४ मिनिटे शिजवावे. आच मध्यम करून नारळाचे दुध घालावे. मका आणि मटार घालावे. थोडे मीठ घालून मिक्स करावे. भाज्या मऊ होईस्तोवर शिजवावे. गरम मसाला, धने-जिरेपूड, आणि लाल तिखट घालून ढवळावे. जर मिश्रणाला थोडा रस राहिला असेल तर थोडी आच मोठी करून थोडे कोरडे करून घ्यावे. भोपळी मिरचीचा शेंडीकाडचा भाग कापून घ्यावा. आतील बिया काढून टाकाव्यात. तयार मिश्रण मिरच्यांमध्ये भरावे. कुस्करलेल्या बटाट्यांमध्ये थोडे मीठ घालावे. आणि परत कुस्करावे, जर गुठळ्या राहिल्या असतील तर त्यात बारीक कराव्यात. भरलेल्या मिरच्या बटाट्याने सील करून टाकाव्यात. नॉनस्टिक पॅनमध्ये ३ टेस्पून तेल घालावे. त्यात मिरच्या सील केलेली बाजू खाली अशा रीतीने ठेवाव्यात. झाकण ठेवून मध्यम आचेवर साधारण २५ मिनिटे शिजवाव्यात. या २५ मिनिटात मध्येमध्ये मिरच्या हलवून पलटाव्यात. म्हणजे करपणार नाहीत आणि समान शिजतील. (मिरच्यांची साले एकदम मऊ बनतील आणि थोडी सुरकुततील) कांदा टोमॅटोची ग्रेव्ही किंवा आवडीची तिखट ग्रेव्ही वर घालून भरली भोपळी मिरची पोळी किंवा भाताबरोबर सर्व्ह करावी.

या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

कसा बनवाल

- कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.
- rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

कसा कराल हा पॅक

- एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.
- यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.
- तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.
- अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

कसा बनवाल मास्क

- एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.
- त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.
- या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.
- त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.
- हा उपाय नियमित करा.



केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

उन्हाळ्याची काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.



उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. ॲंटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो. उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

सकाळी उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवानाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये ॲंटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

स्मार्ट लॉकसह अनलॉक करा : हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

ऑन-बॉडी डिटेक्शन : येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले



जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वसनीय ठिकाणे : तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

विश्वसनीय उपकरणे : विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वासार्ह चेहरा : फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

व्हॉइस मॅच : तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

दातांच्या समस्येने देखील कर्करोग होण्याची शक्यता

कर्करोग (कॅन्सर) होण्याचे नवे कारण सध्या समोर आले आहे. देशातील कित्येक लोकांना दात साफ न केल्यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर) झाल्याचे समोर आले आहे. अशी दिरंगाई करणाऱ्याा लोकांच्या संख्येत ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे लोक कोणत्याही प्रकारच्या तंबाखूचे सेवन करत नाहीत, त्यांना सुद्धा कर्करोग (कॅन्सर) होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या दातांच्या फटी योग्यरीत्या साफ न केल्यामुळे हा गंभीर त्रास उद्भवण्याची शक्यता आहे. अन्नाचे कण दातांमध्ये अडकतात आणि त्यानंतर ते कण कुजतात. कुजलेल्या कणांमुळे सुद्धा कर्करोग होऊ शकतो. मागील सहा वर्षांमध्ये भारतात ओठ आणि तोंडाचा कर्करोग असणाऱ्याा रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या परिस्थितीला रोखण्यासाठी खराब दातांची स्वच्छता, तुटलेले दात याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

काही उपाय

- तंबाखू खाणे टाळा. जर तंबाखू खात असाल तर वेळीच खाणे बंद करा.
- मद्याचे सेवन प्रमाणात करा.
- उन्हामध्ये फार काळ राहणे टाळा. उन्हात जाण्याआधी लिपबामचा वापर करा.
- फास्ट फूड खाणे टाळा किंवा प्रमाणात खा. आहात ताज्या फळांचा वापर करा.
- सतत तंबाखूची तल्लफ येत असल्यास, पायऱ्यांवरून चढ-उतार करा.



वर्किंग वुमन्सने आहारात 'या' पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे



स्त्रियांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घेयला हवी कारण की त्यांना ऑफिस आणि घरात दोन्हीकडे लक्ष द्यावं लागतं. स्त्रिया सर्वांच लक्ष ठेवण्याच्या नादात स्वतःची काळजी घेत नाही. म्हणून वर्किंग वूमन्सला आपल्या आहारात पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे. येथे प्रस्तुत आहे वर्किंग वूमन्ससाठी डायट चार्ट:

ब्रेकफास्ट : वर्किंग वुमन्सने ब्रेकफास्ट स्किप करायला नको. घरातून निघण्याआधी आपण दूध, सांजा, कॉर्नफ्लेक्स किंवा सँडविच घ्या. सकाळच्या नाश्त्यात व्हिॅमिन ए युक्त फळे जशी शेवफळ, पपई आणि स्ट्रॉबेरी खाणे फायदेशीर ठरेल. याबरोबरच थोडेसे ड्रायफ्रुट्स आपल्याजवळ ठेवावे.

लंच : वर्किंग वुमन्सच्या ब्रेकफास्ट आणि लंच यात चार ते पाच तासांचा अंतर हवे. लंचमध्ये भाजी, डाळ, दही, भात आणि पोळीचा समावेश करा. हिरव्या भाज्या जसे ब्रोकोली, पालक, मेथी व इतर आहारात सामील करा. लंचमध्ये सॅलड किंवा कोशिंबीर घ्या.

स्नॅक्स : ऑफिसमध्ये काम करणारे काही लोक संध्याकाळी भूक लागल्यावर काही अनहेल्थी फूड खातात, जे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. संध्याकाळी भूक लागल्यावर फळे किंवा कडधान्य खाणे फायद्याचे ठरेल. याने भूकही भागेल आणि आरोग्यासाठी उत्तमही ठरेल.

डिनर : रात्रीचे जेवण झोपण्याच्या दोन ते तीन तासांपूर्वी घ्यायला हवे. याने अन्न पचायला वेळ मिळतो. रात्री जेवल्याशिवाय झोपू नये. डिनरमध्ये तेलकट पदार्थ खाऊ नयेत. डिनरमध्ये पोळी आणि कमी मसालेदार भाजी किंवा डाळ हवी. डिनरमध्ये घेतला जाणारा आहार लंचपेक्षा लाइट असायला हवा.

शायनी केसांसाठी

एक चमचा ॲप्पल साइडर व्हिनेगरमध्ये १० थेंब आवळ्याचे तेल मिसळा आणि यात एक चमचा मध आणि एक चमचा पाणी मिसळा. आता या मिश्रणाने शाम्पूनंतर पाच मिनिटापर्यंत आपल्या डोक्याचा मालीश करा आणि मग गार पाण्याने केस धुऊन घ्या.



हल्लीच्या जीवनशैलीत प्रत्येक जण लठ्ठपणामुळे त्रस्त आहे. वजन कमी करण्यासाठी कधी डायटिंग तर कधी व्यायाम तर कधी काय...तरी यश हाती लागत नसेल तर सर्वात मोठे कारण आहे की आपल्या डेली डायटमध्ये सामील अशा चार वस्तू ज्यामुळे आपल्या प्रयत्नांना यश मिळत नाहीये. जर या वस्तूंचे सेवन करताना आपण काळजी घेतली नाही तर परिणाम वाईट होऊ शकतात.

लठ्ठपणा कमी करण्यासाठी या चार पदार्थांपासून जरा लांबच राहा!

मीठ : आपण मिठाचे अधिक सेवन करत असाल तर हे आपल्या आरोग्यासाठी धोकादायक ठरेल. एका शोधाप्रमाणे एका दिवसात एक ग्रॅमहून अधिक मीठ सेवन केल्यास लठ्ठपणा वाढू शकतो. संतुलित प्रमाणापेक्षा अधिक मीठ खाणाऱ्यांचे वजन इतर लोकांपेक्षा अधिक असतं. तसेच पॅक्ड पदार्थांमध्ये मिठाचे प्रमाण अधिकच असतं.

साखर : गोड प्रत्येकाला आवडतं, परंतु अधिक प्रमाणात साखर नुकसान करते. कारण साखरेमुळे लठ्ठपणा जलद गतीने वाढतो आणि नंतर यावर नियंत्रण ठेवणं कठीण जातं. आपण दररोजच्या आहारात साखरेचे प्रमाण कमी करून वजन कमी करू शकता. चांगल्या आरोग्यासाठी पुरुषांनी दररोज ५० ग्रॅम आणि महिलांनी ७० ग्रॅमहून अधिक साखरेचे सेवन करू नये.

तांदूळ : आपण तांदूळ खाण्याचे शौकीन असाल तर लठ्ठपणा कमी करणे जरा अवघड आहे. पांढऱ्या तांदळात कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असल्यामुळे लठ्ठपणा वाढतो. वजन कमी करण्याची इच्छा असल्यास पांढऱ्याऐवजी ब्राऊन राईसचे सेवन करावे.

मैदा : मैदा आणि मैद्याचे खाद्यपदार्थ सेवन केल्याने लठ्ठपणा कधीच कमी होणार नाही. कारण मैद्यामुळे शरीरात ब्लड शुगर वेगाने वाढते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि कर्करोग यासारखे आजार होण्याची शक्यता वाढते.



पाणी पिणाऱ्याची बुद्धी पाणीदार

पाणी प्यायल्यामुळे बुद्धी तेज होते आणि कोणत्याही माहितीचे आकलन पटकन होते, असे इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या एका प्रयोगात आढळले आहे. ईस्ट लंडन स्कूल ऑफ सायकॉलॉजी या संस्थेमध्ये पाणी आणि आकलन शक्ती यांच्या संबंधावर काही प्रयोग करण्यात आले, तेव्हा असे आढळले की माणूस पाणी पिऊन एखादे वाचन करतो तेव्हा त्याला वाचलेल्या मजकुराचे आकलन चांगले होते. याउलट एखाद्या व्यक्तीला भरपूर तहान लागलेली असताना सुद्धा प्यायला पाणी न देता वाचन करायला लावले तर किंवा एखादे काम करायला लावले तर ती व्यक्ती पाणी



प्यायलेल्या व्यक्तीपेक्षा मंदपणे आकलन करते. या दृष्टीने या संस्थेने या लोकांवर प्रयोग केले आणि तहानलेल्या अवस्थेत त्यांना काही अवघड कामे सांगितली. तेव्हा त्यांना ती कामे व्यवस्थित समजली नाहीत. उलट भरपूर पाणी प्यायलेल्या लोकांना हीच कामे सांगितली तेव्हा त्यांना ती १४ टक्के जास्त वेगाने समजली.

यामागचे कारणे काय असावे, याचा छडा लावण्यात आला. तेव्हा असे आढळले की कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी आपल्या शरीरातील व्हॅसोप्रेसिन हे हार्मोन कार्यरत व्हावे लागते. कमी पाणी प्यायलेल्या अवस्थेत हे हार्मोन कार्यरत होत नाहीत आणि भरपूर पाणी प्यायल्यास ते कार्यरत होते.

सकाळी उठल्या उठल्या काय खावे हा प्रश्न अनेकांना पडतो. भारतीयांमध्ये तर उठल्याबरोबर चहा घेणे ही जणू रीतच आहे. मात्र नुसता चहा घेणे आरोग्यासाठी घातक असल्याचे मागील काही काळापासून बोलले जात असल्याने त्यासोबत बिस्किटे, खारी, टोस्ट खाण्याचे प्रमाण वाढले. मात्र चहा-कॉफी दिवसाची सुरुवात करताना घेऊच नये, असे अनेक आहारतज्ज्ञ सांगताना दिसतात. त्यामागे काही महत्त्वपूर्ण कारणे नक्कीच आहेत. काही गोष्टी रिकाम्या पोटी खाल्ल्यास आरोग्याला दीर्घकालीन अपाय होऊ शकतात. त्यामुळे रिकाम्या पोटी कोणत्या गोष्टी खाणे किंवा पिणे टाळावे हे जाणून घेऊया...



रिकाम्या पोटी 'हे' पदार्थ खाणे टाळाच!

चहा-कॉफी

सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी घेण्याची सवय अनेकांना असते. हे योग्य नाही, हे माहीत असूनही केवळ लहानपणापासूनची सवय म्हणून किंवा कुटुंबातून चालत आलेली परंपरा म्हणून ते चालूच ठेवतात. मात्र आरोग्यासाठी हे अजिबात चांगले नसून चहामुळे पोटातील ॲसिड वाढते. त्यामुळे अल्सर किंवा छातीतील जळजळ वाढते.

याप्रमाणेच उठल्यावर कॉफी प्यायल्याने फ्रेश वाटते असे अनेकांचे म्हणणे असते. मात्र शरीरातील हॉर्मोन्सचे संतुलन बिघडण्यास कॉफी कारणीभूत ठरते. एकदा हॉर्मोन्सचे संतुलन बिघडले की ते पूर्वपदावर येण्यास बराच वेळ लागतो.

औषधे

झोपेतून उठल्यावर लगेच औषधे घेऊ नयेत, असा सल्ला डॉक्टरही आपल्या रुग्णांना अनेकदा देतात. ॲंटीबायोटिक्समधील घटक आतड्यांना त्रासदायक ठरू शकतात. यामुळे आतड्यांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. या औषधांमुळेही अल्सर होण्याची शक्यता असते.

म्हणून उठल्यावर औषधे घेऊ नयेत.

मसालेदार पदार्थ

सकाळच्या नाश्त्याला तिखट किंवा मसालेदार पदार्थ खाऊ नयेत. मसाले किंवा मिरच्यांमुळे पोटात ॲसिडची निर्मिती होते. यामुळेही अल्सर होऊ शकतो. तिखट पदार्थ सकाळी सकाळी खाल्ल्यामुळे शौचासही त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो तेलकट आणि तिखट पदार्थ नाश्त्याला टाळावेत.

बीयर आणि शीतपेये

सकाळी उठल्यावर शक्यतो कोणी शीतपेये आणि बीयर पीत नाही. मात्र सकाळपासून पोट रिकामे असले आणि एकदम जेवणादरम्यान शीतपेय किंवा बीयर घेतल्यास ते आरोग्यासाठी अतिशय हानीकारक ठरु शकते. रिकाम्या पोटी बीयर घेतल्यास जास्त नशा चढते आणि ते आरोग्यासाठीही हानीकारक असते. शीतपेयांमुळे मळमळणे, ॲसिडिटी अशा समस्या उद्भवू शकतात.



तात्पुरती उपचार केंद्रे

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्येही तात्पुरती उपचार केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.स्थानिक ग्रामस्थ, ह्यकासव मित्रह्ण आणि प्रशासन यांच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा संवर्धन उपक्रम समुद्री जैवविविधतेच्या संरक्षणासाठी महत्त्वाचा ठरत असून, राज्यातील किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले कासवांच्या संवर्धनाला नवी बळकटी मिळत आहे.

१ लाख ८ हजार ५९६ कासवांची पिल्ले समुद्रात झेपावली

५६ समुद्रकिनाऱ्यांवरून 'ऑलिव्ह रिडले' कासव संवर्धन उपक्रम

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

महाराष्ट्र शासनाच्या वन विभागांतर्गत कांदळवन कक्ष, कांदळवन प्रतिष्ठान आणि स्थानिक 'कासव मित्र' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ऑलिव्ह रिडले समुद्र कासव संवर्धन कार्यक्रमाला यंदा मोठे यश मिळाले आहे. सन २०२५-२६ च्या हंगामात राज्यातील ५६ समुद्रकिनाऱ्यांवर एकूण १ हजार ७२४ कासवांच्या घरट्यांची नोंद झाली असून, त्यांमधून तब्बल १ लाख ८ हजार ५९६ पिल्लांना यशस्वीरीत्या समुद्रात सोडण्यात आले. यंदाच्या हंगामात उबवण यशाचे प्रमाण ६१.२० टक्के नोंदविण्यात आले आहे. राज्याच्या किनारपट्टीवर रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक ९६४ घरट्यांची नोंद झाली असून, तेथून ५४ हजार २२७ पिल्ले समुद्रात झेपावली, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७३८ घरट्यांतून ५३ हजार ३२५ पिल्लांना सुरक्षितपणे समुद्रात सोडण्यात आले. सिंधुदुर्गमध्ये सर्वाधिक ६९.९५ टक्के उबवण यशाची नोंद झाली असून, रायगड जिल्ह्यातील २२ घरट्यांतून १ हजार ४४ पिल्ले समुद्रात सोडण्यात आली. विशेष म्हणजे, यंदा रायगडमधील आरावी, रत्नागिरीतील वेळणेश्वर, वरवडे, नेवरे, ढोकामळे, पूर्णगड, सालदुरे, पानंदे आणि कचरे तसेच सिंधुदुर्गमधील दाभोळी व कोंडुरा या किनाऱ्यांवर प्रथमच कासवांची घरटी आढळली. त्यामुळे ही किनारपट्टी ऑलिव्ह रिडले कासवांच्या प्रजननासाठी महत्त्वपूर्ण अधिवास असल्याचे स्पष्ट झाले आहे. सागरी परिसंस्थेचा समतोल राखणाऱ्या या संरक्षित कासवांच्या संरक्षणासाठी वन विभागाने स्थानिक मच्छिमारांच्या सहकार्याने व्यापक मोहीम हाती घेतली आहे. सन २०१८ पासून सुरू असलेल्या नुकसानभरपाई योजनेंतर्गत मासेमारीच्या जाळ्यात अडकलेल्या समुद्री कासवांना जाळे कापून जीवनदान देणाऱ्या मच्छीमारांना आर्थिक मदत दिली जात आहे. या योजनेद्वारे आतापर्यंत ४८६ कासवांना वाचविण्यात यश आले असून, मच्छिमारांना सुमारे ६१ लाख २१ हजार ८५० रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली आहे.

'मरीन रिस्पॉन्डंट' गटांची स्थापना

पावसाळ्यात जखमी अवस्थेत किनाऱ्यावर वाहून येणाऱ्या कासवांवर तातडीने उपचार करण्यासाठी कांदळवन कक्षाने 'मरीन रिस्पॉन्डंट' गटांची स्थापना केली आहे. या गटामध्ये वन कर्मचारी, पशुवैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सध्या डहाणू येथे उपचार व संक्रमण केंद्र कार्यरत असून, मुंबई आणि परिसरातील किनाऱ्यांसाठी ऐरोली येथे सुसज्ज केंद्र उभारण्यात आले आहे.

नववीच्या पुस्तकातील 'नृत्यांगनेच्या' नग्न प्रतिमेवरुन वाद

एनसीईआरटीचा यू-टर्न... काय घडलंय नेमकं?

■मुंबई । प्रतिनिधी,


इयत्ता नववीच्या कला शिक्षणाच्या पाठ्यपुस्तकातील हडप्पाकालीन प्रसिद्ध ह्यनृत्यांगनाह्ण मूर्तीच्या एडीटेड चित्रावरुन निर्माण झालेला वाद आता नव्या वळणावर आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद यांनी या मूर्तीची मूळ प्रतिमा पुन्हा पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण मंत्रालयाने स्पष्टीकरण मागवल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

वादानंतर एनसीईआरटीचा महत्त्वाचा निर्णय

नववीच्या 'मधुरिमा' या कला शिक्षणाच्या नव्या पुस्तकात मोहेंजो-दारो येथील प्रसिद्ध कांस्य नृत्यांगना मूर्तीची प्रतिमा एडीट स्वरूपात प्रकाशित करण्यात आली होती. मूर्तीच्या धडाचा भाग झाकण्यात आल्यामुळे इतिहास, कला आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी प्रश्न उपस्थित केले होते. या पार्श्वभूमीवर एनसीईआरटीने मूळ प्रतिमा पुनर्संचयित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता कलाकृतीचे मूळ स्वरूप पाहता येणार आहे.

डिजिटल आवृत्तीत तातडीने होणार बदल

मिळालेल्या माहितीनुसार,



एनसीईआरटीच्या अधिकृत संकेतस्थळावरील डिजिटल पाठ्यपुस्तकात त्वरित सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच अद्याप छपाई न झालेल्या पुस्तकांच्या प्रतींमध्येही मूळ प्रतिमा समाविष्ट केली जाणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या छापील पुस्तकांमध्येही ही सुधारित आवृत्ती उपलब्ध असेल. यामुळे वादग्रस्त संपादन कायमस्वरूपी मागे घेतले जाणार आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या हस्तक्षेपानंतर घडामोडी

या प्रकरणाची दखल घेत शिक्षण मंत्रालयाने एनसीईआरटीकडून स्पष्टीकरण मागितले होते. विशेष म्हणजे, इयत्ता सहावीच्या सामाजिक शास्त्राच्या पुस्तकात हीच प्रतिमा मूळ स्वरूपात समाविष्ट असताना नववीच्या पुस्तकात ती संपादित का करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मंत्रालयाच्या हस्तक्षेपानंतर एनसीईआरटीने आपली भूमिका बदलल्याचे समजते. त्यामुळे शैक्षणिक सामग्रीतील सातत्य आणि ऐतिहासिक अचूकतेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

इतिहासकारांनी आधीच व्यक्त केली होती नाराजी

प्रसिद्ध इतिहासकार मिशेल डॅनिनो यांनी यापूर्वीच या विषयावर भाष्य केले होते. त्यांच्या मते, नृत्यांगना मूर्ती ही भारतीय पुरातत्त्व आणि सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. ती राष्ट्रीय संग्रहालयात प्रदर्शित केली जाते आणि अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना शिकवली जाते. त्यामुळे तिच्या प्रतिमेवर कोणतेही अनावश्यक संपादन करण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

कला आणि इतिहास शिक्षणातील पारदर्शकतेचा प्रश्न

या संपूर्ण प्रकरणामुळे शालेय शिक्षणातील ऐतिहासिक आणि कलात्मक सामग्री कशी सादर केली जाते, यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, विद्यार्थ्यांना इतिहास आणि संस्कृतीची माहिती मूळ स्वरूपात मिळणे आवश्यक आहे. शैक्षणिक पुस्तकांमध्ये कोणताही बदल करताना तथ्य, संदर्भ आणि शैक्षणिक मूल्य यांना प्राधान्य दिले पाहिजे. एनसीईआरटीच्या नव्या निर्णयामुळे हा वाद तात्पुरता शांत झाला असला, तरी शैक्षणिक सामग्रीतील पारदर्शकतेबाबतचा प्रश्न कायम राहणार आहे.

सागरी सुरक्षेला बळ... सागर रक्षक दलाच्या स्वयंसेवकांची संख्या पोहोचली ३ हजार १५६ वर

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई किनारपट्टीच्या सुरक्षेला अधिक बळकट करण्यासाठी मुंबई पोलिसांनी 'सागर रक्षक दल' या लोकसहभागावर आधारित स्वयंसेवक दलाचा विस्तार आणि सक्षमीकरण सुरू केले आहे. किनारपट्टी भागातील कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचे 'डोळे आणि कान' म्हणून हे दल काम करते. जनतेच्या वाढत्या प्रतिसादामुळे सागरी हालचालींवर लक्ष ठेवण्यात पोलिसांना मदत करणाऱ्या स्वयंसेवकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन ती ३ हजार १५६ वर पोहोचली आहे.



"विशेष सदस्यत्व मोहिमेद्वारे हे दल अधिक मजबूत केले जात आहे. या मोहिमेचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर नवीन स्वयंसेवक या उपक्रमात सामील झाले आहेत. पोलीस या सदस्यांशी नियमित संवाद साधत असून त्यांना मार्गदर्शन करत आहेत."

-विजयकांत सागर, पोलीस उपायुक्त, बंदर परिमंडळ

किनारपट्टी भागातील दक्षता राखण्यात सागर रक्षक दलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, हे ओळखून मुंबई पोलिसांनी आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सागरी पोलीस ठाण्यांना नवीन सदस्यांची नोंदणी करण्याचे निर्देश दिले होते. यासाठी एक विशेष सदस्यत्व मोहीम राबवण्यात आली. परिणामी, मुंबईभरात सागरी सुरक्षेसाठी पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या सागर रक्षक दलाच्या सदस्यांची संख्या आता ३ हजार १५६ वर पोहोचली आहे. किनारपट्टी आणि समुद्रातील हालचालींबाबत गुप्त माहिती गोळा करण्यासाठी पोलीस अधिकारी या स्वयंसेवकांसोबत नियमित बैठका घेत आहेत. मच्छिमार, किनारपट्टीवरील रहिवासी आणि प्रवासी बोटचालक यांची साथ तितकीच महत्त्वाची आहे, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

तातडीने कारवाई करणे शक्य

कोणतीही संशयास्पद हालचाल, वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास स्वयंसेवकांनी तातडीने ११२ या आपत्कालीन हेल्पलाइनवर कॉल करावा किंवा थेट स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना माहिती द्यावी, अशा सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. यामुळे तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य होईल आणि मुंबईच्या सागरी सुरक्षेची यंत्रणा अधिक भक्कम होणार आहे.

नालासोपाऱ्यात बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल

■वसई।प्रतिनिधी,

वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक परवानगी आणि प्रमाणपत्र नसतानाही क्लिनिक चालवत नागरिकांवर उपचार केल्याप्रकरणी आचोळे पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोग्य विभागाच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली असून या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. सुधीर यशवंतराव पांढरे (वय 45), वैद्यकीय अधिकारी, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आचोळे यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. 15 जून रोजी आदर्श कॉलनी, शिर्डीनगर, नालासोपारा पूर्व येथील दोन ठिकाणी तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत अशोककुमार अमरनाथ तिवारी (वय 48) आणि समिरकुमार बागची (वय 72) हे आवश्यक वैद्यकीय पदवी, नोंदणी आणि अधिकृत प्रमाणपत्र नसताना वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे आढळून आल्याचा आरोप आहे. तसेच त्यांच्या ताब्यात औषधे आणि इंजेक्शन्स आढळून आली असून त्यांनी अनधिकृतपणे क्लिनिक सुरू केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनुसार, संबंधितांनी स्वतःला वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकार असल्याचे भासवून नागरिकांवर उपचार केले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याने आरोग्य विभागाने पोलिसांकडे तक्रार दिली. या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 318(2) तसेच सौंदर्य प्रसाधने व औषधे अधिनियम 1940 चे कलम 27 आणि मुंबई नर्सिंग होम नोंदणी अधिनियम 1949 चे कलम 6 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक कुंभार करत आहेत.

वाशिम जिल्ह्यातील पत्नीसह दोन चिमुकल्यांना विहिरीत ढकलून घेतला गळफास

■वाशिम। प्रतिनिधी,

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील तिवळी गावात एकाच कुटुंबातील चौघांच्या मृत्यूची धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना घडली. एका व्यक्तीने प्रथम पत्नी आणि दोन मुलांना विहिरीत ढकलून दिले व त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. मात्र, मृत महिलेच्या भावाने या घटनेबाबत संशय व्यक्त केला असून, हा आत्महत्येचा प्रकार नसून घातपात असल्याचा आरोप केला आहे.

वाशिम जिल्ह्यातील तिवळी गावात घडलेल्या या घटनेत, संतोष तुकाराम बकाल (३५) यांनी आपली पत्नी तसेच मुलगी जान्हवी (७) आणि मुलगा सोहम (5) यांना विहिरीत ढकलून दिल्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

चौघांच्या मृत्यूबाबत घातपाताचा संशय

या दुदैर्वी घटनेमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असले तरी, मृत महिलेच्या भावाने हा आत्महत्येचा प्रकार नसून घातपात असल्याचा आरोप केला आहे. सध्या शिरपूर पोलिस या प्रकरणाची आत्महत्या आणि हत्या अशा दोन्ही अंगांनी सखोल चौकशी करत असून, एकाच कुटुंबातील चार जणांच्या मृत्यूमुळे तिवळी गावासह संपूर्ण परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.



चरित्राच्या संशयातून बायकोची हत्या... पतीविरुद्ध गुन्हा दाखल

■वसई। प्रतिनिधी,

पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत चरित्राच्या संशयातून पतीने आपल्या पत्नीची मारहाण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पेल्हार पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार अर्जदार मेहफूज शेर अली शेख (वय 30) यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, 9 जून 2026 रोजी रात्री सुमारे10 वाजण्याच्या सुमारास आरोपी कलाम खान (वय 40) याने पत्नी नसीबुन्नीसा हिच्या चारित्र्यावर संशय घेत तिच्याशी वाद घालत हाताने, लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी पट्टीने बेदम मारहाण केली. मारहाणीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नसीबुन्नीसा बाथरूमला जाऊन परत झोपली असता तिच्या शरीराची कोणतीही हालचाल होत नसल्याचे निदर्शनास आले त्यात तिचा मृत्यू झाल्याचा आरोप फियार्दीने केला आहे. या तक्रारीच्या आधारे पेल्हार पोलिसांनी आरोपी कलाम खान याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इटर) कलम 103(1) अन्वये 12 जून 2026 रोजी खुनाचा गुन्हा दाखल केला असून आरोपीला काही तासांतच पेल्हार पोलिसांनी आरोपीला गजाआड केले आहे.

वृद्ध दाम्पत्याकडून 4 लाख रुपये लुटले, पण खाते बंद केल्याने सायबर ठग संतापला अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

ऑनलाइन फसवणुकीला बळी पडल्यानंतर उरलेली रक्कम वाचवण्यासाठी बँक खाते बंद केले अन् सायबर ठग जर तुमच्यावरच संतापला तर... अशीच घटना जोगेश्वरी येथील एका वृद्ध दाम्पत्यासोबत घडली आहे. फसवणूक झाल्यानंतर दाम्पत्याने पोलिसांकडे धाव घेतली. दरम्यान, आंबोली पोलीस ठाण्यात एका अज्ञात भामट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

जोगेश्वरी पश्चिम भागात राहणाऱ्या 69 वर्षीय तक्रारदार महिला आपल्या पतीसोबत (जे उत्पादन शुल्क विभागाचे निवृत्त कर्मचारी आहेत) घरी एकट्याच राहतात, तर त्यांचा मुलगा आणि मुलगी दुसऱ्या शहरात राहतात. भामट्याने अवघ्या तीन दिवसात या दाम्पत्याच्या बँक खात्यातून सुमारे 3.80 लाख रुपये काढून घेतले. या फसवणुकीची सुरुवात 9 जून रोजी झाली, जेव्हा त्या महिलेला एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख ऑनलाइन वस्तू पुरवठा करणाऱ्या कंपनीचा कर्मचारी म्हणून करून दिली आणि जुन्या व्यवहाराचे पैसे परत (रिफंड) मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्याने महिलेला तिच्या फोनची स्क्रीन शेअर करण्यास सांगितली. त्या महिलेने भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्क्रीन शेअर केली. त्यानंतर तांत्रिक बिघाडाचे कारण सांगून भामट्याने कॉल कट केला. जेव्हा महिलेने तिचे ऑनलाइन वॉलेट तपासले, तेव्हा ते काम करत नसल्याचे तिला आढळले. दुसऱ्या दिवशी (10 जून) त्याच भामट्याने पुन्हा व्हिडीओ कॉल केला. वॉलेट लवकरच सुरू होईल आणि पैसे परत मिळतील असे सांगून त्याने पुन्हा एकदा महिलेची स्क्रीन शेअर करून घेतली. 11 जून रोजी त्याने महिलेला पुन्हा फोन केला आणि कुटुंबातील अशा सदस्याचा क्रमांक मागितला ज्याचे ऑनलाइन वॉलेट सक्रिय आहे. महिलेने तिच्या पतीचा क्रमांक दिला. त्यानंतर भामट्याने महिलेच्या पतीला फोन केला आणि त्यांचीही स्क्रीन शेअर करून घेतली. स्क्रीन शेअर होताच



महिलेच्या पतीच्या खात्यातून 98,205 रुपये कमी झाले. त्यांनी तत्काळ आपल्या पत्नीला या घटनेची माहिती दिली. जेव्हा महिलेने तिचे खाते तपासले, तेव्हा तिला समजले की गेल्या तीन दिवसात त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने 2.80 लाख रुपयांहून अधिक रक्कम काढून घेण्यात आली आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच वृद्ध दाम्पत्याने खाते बंद करण्यासाठी बँकेकडे धाव घेतली. तर त्यांच्या मुलीने सायबर हेल्पलाईन क्रमांक 1930 वर तक्रार नोंदवली. खाते ब्लॉक होताच तो भामटा संतापला आणि त्याने त्या वृद्ध जोडप्याला फोन करून खाते ब्लॉक केल्याबद्दल त्यांना धमकावण्यास सुरुवात केली. भामट्याच्या या वागणुकीमुळे घाबरलेल्या जोडप्याने आंबोली पोलिसांशी संपर्क साधून अधिकृत तक्रार दाखल केली.

जिल्हाधिकार्यांच्या नावाने बनवले बनावट व्हॉट्सॲप खाते, दोघांना अटक

पालघरः पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकार्यांच्या नावाने बनावट व्हॉट्सॲप अकाऊंट तयार करून नागरिकाची फसवणूक करणार्या दोन सायबर भामट्यांना झारखंड राज्यातून अटक करण्यात पालघर सायबर पोलिसांना मोठे यश आले आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात फसवणूक झालेली संपूर्ण ५० हजार रुपयांची रक्कमही पोलिसांनी हस्तगत केली आहे.या प्रकरणातील फियार्दी विनीतकुमार मुंशीलाल मीणा (वय २८, रा. वागुळसार, पालघर पश्चिम) यांना १७ मे २०२६ रोजी त्यांच्या व्हॉट्सॲपवर एका अज्ञात व्यक्तीकडून संदेश प्राप्त झाला. संबंधित व्यक्तीने आपल्या व्हॉट्सॲप प्रोफाईलवर पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांचा फोटो लावून स्वतःची खोटी ओळख निर्माण केली. विश्वास संपादन करत फियार्दीकडून तातडीने ५० हजार रुपये एका बँक खात्यावर पाठविण्याची विनंती करण्यात आली. फियार्दीनी विश्वास ठेवून रक्कम पाठविली. मात्र नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर सायबर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६६(सी) व ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि बँक खात्यांच्या व्यवहारांची सखोल पडताळणी केली. त्यातून आरोपी बलवंतकुमार कमलप्रसाद मंडल (वय २६) आणि राजुकुमार दुखन रवानी (वय २२), दोघेही धनबाद, झारखंड) येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी झारखंडमध्ये जाऊन दोघांनाही अटक केली. तसेच गुन्ह्यातील अपहृत ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तथा सायबर पोलीस स्टेशनचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक समीर भोसले, रोहित खोत, विशाल शिर्के, राजेश वाघ तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

परदेशात नोकरी लावण्याच्या बहाण्याने 5 लाखांची फसवणूक

■वसई। प्रतिनिधी,



परदेशात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची आणि त्याच्या मित्राची 5 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात फसवणुकीसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अमित रामचंद्र महेरोत्रा (वय 33) यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. आरोपी मोझेस सिंगराज पिल्लई याने परदेशात नोकरी लावून देण्याचे सांगून फियार्दी आणि त्यांचा मित्र गणेश पवार यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने नोकरी लावून देण्याच्या नावाखाली दोघांकडून एकूण 5 लाख रुपये घेतले. मात्र पैसे घेतल्यानंतरही आरोपीने नोकरीची कोणतीही व्यवस्था केली नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फियार्दीने माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी माणिकपूर पोलिसांनी आरोपी मोझेस सिंगराज पिल्लई याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम 318(4), 336(2), 336(3) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीचा संबंध वसई येथील स्काय मरीन कन्सल्टन्सीशी असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास माणिकपूर पोलीस करत आहेत.

ज्या दिवशी लग्न ठरणार त्याचं दिवशी प्रेमाचा भयानक शेवट!

नाशिकमध्ये तरुणासह घडली मन सुन्न करणारी घटना

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये तरुणासह घडली मन सुन्न करणारी घटना घडली आहे. ज्या दिवशी लग्न ठरणार त्याचं दिवशी असं काही तरी घडेल याचा त्याने स्वप्नातही विचार केला नव्हता. एका तरुणाच भयानक अंत झाला आहे. विशेष म्हणजे लग्नाची बोलणी करण्यासाठी मुलीचा घरी गेला असताना त्याची हत्या झाली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

प्रेमसंबंधाच्या वादातून एका 24 वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आल्याची अत्यंत धक्कादायक आणि थरारक घटना कन्हेरवाडी (ता. कळवण) येथे घडली. लग्नाची बोलणी करण्यासाठी बोलावून तरुणाचा जीव घेणाऱ्या या क्रूर कृत्यामुळे संपूर्ण कळवण तालुका हादरला असून, परिसरात संतापाची लाट उसळली आहे. मृत तरुण सचिन मोतीराम चौरे (रा. नरूळ, ता. कळवण) याचे एका युवतीसोबत प्रेमसंबंध होते. या संबंधांना दोन्ही कुटुंबांची संमती होती.

याच संदर्भात लग्नाची बोलणी करण्यासाठी मुलीकडची मंडळी कन्हेरवाडी येथे सचिनच्या बहिणीच्या घरी आली होती. बोलणी सुरळीत सुरू असताना, मुलीचे मावसभाऊ मोहन बागुल, योगेश बागुल आणि मुलीचा मेहुणा संदीप महादू पवार (रा. चणकापूर) यांनी सचिनला बोलण्याच्या बहाण्याने एका खोलीत नेले. खोलीत नेताच, काही समजण्याच्या आतच त्यांनी नियोजनबद्धरीत्या सोबत आणलेल्या धारदार शस्त्राने सचिनच्या डोक्यावर आणि छातीवर सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या सचिनचा उपचारापूर्वीच दुदैर्वी मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच कळवण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र टेंभेकर आणि त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तिन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी कळवण उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे या घटनेमुळे



नातेवाईकांनी रुग्णालय व पोलीस ठाण्याबाहेर मोठी गर्दी केली होती. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

या प्रकरणी मोतीराम एकनाथ चौधरी यांच्या फियार्दीवरून कळवण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १४७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३५२, ३५१ (२), (३) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी किरण कुमार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश बोरसे वनी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गायत्री जाधव, पीएसआय कुटे, सुरगाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, अभोणा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे, पोलीस हवालदार प्रशांत तिडके, पुंडलिक डंबाळे, निलेश शेवाळे, पंकज शेवाळे, संदीप गवळी, सह आदी पोलीस करीत आहेत.

भरदिवसा झालेल्या या हत्याकांडामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे आरोपींना कडक शिक्षा व्हावी यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. नागरिकांना नम्र विनंती आहे की, त्यांनी कायदा हातात घेऊ नये आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, दोषींना कायद्याच्या चौकटीत राहून कठोर शिक्षा होईल याची आम्ही खात्री देतो." असे आवाहन देखील खगेन्द्र टेंभेकर पोलीस निरीक्षक कळवण यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com